जनसंपर्क कक्ष
0 6 APR 2025
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या मूल्यांचा वारसा अधोरेखित व्हावा : डॉ. जाधव

## ‘शाहूपूर्व व शाहूकालीन पत्रकारिता’ पुस्तकाचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांनी दिलेल्या मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुनःपुन्हा अधोरेखित करून त्याची नव्याने मांडणी करायला हवी, अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार डॉ. राधेश्याम जाधव यांनी आज येथे व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या ‘शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे’ पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते ‘शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा’ विषयावर बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मास कम्युनिकेशन विभागाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : डॉ. शिवाजी जाधव लिखित ‘शाहूपूर्व व शाहूकालीन पत्रकारिता’ पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व ज्येष्ठ पत्रकार डॉ. राधेश्याम जाधव.

डॉ. जाधव म्हणाले, ‘‘छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधूता मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. यात कोणत्याही स्वरूपाच्या भेदभावाला थारा नव्हता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली आणि त्यांनी माहितीच्या पलीकडे जाऊन ज्ञानाच्या निर्मितीवर भर दिला. राजर्षी शाहू महाराज हे वेदोक्त प्रकरणाकडे मूल्यांसाठीचा लढा याच दृष्टिकोनातून पाहात होते. या मूल्यांतूनच नैतिकता उभी राहते. त्यातून नीतीशास्त्राची चौकट सामाजिक आयुष्यात उभी राहते, याची जाणीव त्यांना होती. शब्द आणि ग्रंथ प्रामाण्य मानले, तर चिकित्सा थांबते आणि कर्मसिद्धांतान्वये प्रारब्ध मानले, तर कर्तृत्व थांबते. त्यामुळे या सर्व महामानवांनी या बाबींना स्पष्ट नकार दिला.’’

डॉ. शिर्के म्हणाले, ‘‘डॉ. राधेश्याम जाधव यांनी स्थानिक भारतीयांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला प्राधान्य दिले, याचा अभिमान वाटतो.’’ या वेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, राजकीय विश्लेषक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, डॉ. जे. के. पवार, इंद्रजित सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जी.बी. कोळेकर, वसंतराव मुळीक उपस्थित होते. डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. प्रवीण पांढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.